# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

(प्रसिद्धिपत्रक) दि. ७ डिसेंबर २०१६

## नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक दुसरा टप्पा
## पुणे आणि लातूर जिल्ह्यांत सदस्यपदांसाठी १,३२६ व अध्यक्षपदांसाठी १०६ नामनिर्देनपत्रे

मुंबई, दि.७: नगरपरिषद निवडणुकांच्या दुसऱ्या टप्प्यात १४ डिसेंबर २०१६ रोजी मतदान होत असलेल्या पुणे आणि लातूर जिल्ह्यातील १४ नगरपरिषदांच्या ३२४ सदस्यपदांच्या जागांसाठी १ हजार ३२६; तर थेट नगराध्यक्षपदाच्या १४ जागांसाठी १०६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, या सर्व १४ नगरपरिषदांच्या निवडणुकांसाठी सर्व नामनिर्देनपत्रे संगणकीय प्रणालीद्वारे प्राप्त झाली आहेत. या सर्व ठिकाणी १४ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. दुसऱ्या दिवशी १५ डिसेंबर २०१६ रोजी मतमोजणी होईल.

**नगरपरिषदनिहाय सदस्यपदांसाठी आणि थेट नगराध्यक्षपदांसाठी निवडणूक रिंगणातील उमेदवारांची संख्या अशी (कंसात एकूण जागा): पुणे: बारामती (३९)**- १७१ व ७, **तळेगाव- दाभाडे (२६)**- ५१ व २, **लोणावळा (२५)**- १११ व ६, **दौंड (२४)**- ११२ व ९, **जुन्नर (१७)**- ७० व १३, **शिरूर (२१)**- ७२ व ५, **आळंदी (१८)**- ५७ व ८, **सासवड (१९)**- ५३ व ६, **जेजुरी (१७)**- ५१ व ५ आणि **इंदापूर (१७)**- ७७ व ७. **लातूर: उद्‌गीर (३८)**- १८५ व १२, **अहमदपूर (२३)**- ११५ व ६, **औसा (२०)**- १०१ व १३ आणि **निलंगा (२०)**- १०० व ७. **एकूण (३२४)**- १,३२६ व १०६.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)